# महाराष्ट्र विधानपरिषद

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या – २०

---

### राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांत वैद्यकीय चाचण्यांसाठी लागणाऱ्या 'रिएजंटचा' तुटवडा भासत असल्याबाबत

**(१) २१२२७ (०६-१२-२०२३) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये हाफकिन बायोफार्माकडून आजाराच्या निदानाच्या वैद्यकीय चाचण्यांसाठी लागणारे रिएजंट सन २०१९-२०२० पासून रुग्णालयांना रीतसर पाठविण्यात आले नसल्याने रिएजंटच्या तुटवड्यामुळे गोरगरीब रुग्णांना खाजगी पॅथोलॉजी लॅबमधून चाचण्या कराव्या लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वैद्यकीय महाविद्यालयांसह जे-जे रुग्णालयांमध्येही यातील अनेक वैद्यकीय चाचण्यांची उपलब्धता नसल्यामुळे रुग्णांना या चाचण्या हजारो रुपये खर्च करुन बाहेरील लॅबमध्ये कराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळामध्ये आजाराच्या निदान निश्चितीसाठी जिल्हानिहाय प्रयोगशाळा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात त्यावर कोणतीच प्रभावी अंमलबजावणी झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक रुग्णालयांत औषधांप्रमाणे आजाराच्या निदानाच्या वैद्यकीय चाचण्यांसाठी लागणाऱ्या 'रिएजंटचा' पुरवठा सुरळीत करण्याबाबत व गरीब व गरजू रुग्णांना गंभीर आजारांचे निदान माफक दरात सार्वजनिक रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील गरीब व गरजू रुग्णांना आजाराचे निदान माफक दरात होण्याकरीता MJPJY, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना, आयुष्यमान भारत, सिकलसेल युनिट, बीपीएल इ. योजना कार्यान्वित असल्यामुळे गंभीर रुग्णांच्या चाचण्या माफक दरात करता येतात.
(५) लागू नाही.

---

## राज्यातील अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरणेबाबत

**(२) २१२८७ (०६-१२-२०२३) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक १७००७ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक अंगणवाडीसाठी इमारतीसह १७००० अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाची भरती करण्याची घोषणा माहे सप्टेंबर मध्ये वा त्यादरम्यान मा.मंत्री महोदय यांनी केली असून अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देवून, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी, महागाईभत्ता व इतर भत्ते देण्यात यावेत यासाठी या कर्मचाऱ्यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास संपूर्ण राज्यात धरणे आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची पोषण आहारात महत्वाची भुमिका असून ० ते ६ वयोगटातील बालसंगोपनाचे काम अंगणवाडी सेविका बजावित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आली असून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीनआहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१४-१२-२०२३) :** (१) अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देणे इत्यादी मागण्यांसाठी धरणे आंदोलन केले होते.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये शासन निर्णय दिनांक ०३/०४/२०२३ अन्वये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी माहे एप्रिल,२०२३ पासून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेला डावलण्यात आल्याबाबत

**(३) २१७३२ (०६-१२-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) राज्यातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांमध्ये पक्षपात झाल्याचा आरोप अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी केला असून त्यात महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेला डावलण्यात आले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरस्कार निवडीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या बैठकीस क्रीडा तज्ञ आणि क्रीडा मंत्रीही उपस्थित नसून शिवछत्रपती पुरस्कारासाठी क्रीडा आयुक्तांनी चुकीची माहिती दिल्याचे मत अनेक खेळाडूंनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देताना पुरस्कारासाठी नियुक्त करण्यात आलेले तज्ञ बैठकीस आले नसताना पुरस्कार देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पुरस्कारांमध्ये विविध संघटनेच्या सदस्यांना सामावून घेऊन या पुढील सर्व पुरस्कार देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (१४-१२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांच्या वेतन त्रुटी दूर करण्याबाबत

**(४) २१९०३ (०३-१२-२०२३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांच्या वेतन त्रुटी दूर करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनही शासनाकडून अद्याप उपायोजना करण्यात न आल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या रायगड जिल्ह्यातील शिक्षक परिषदेने मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार वेतन त्रुटी समिती गठीत करावी अशी मागणी शिक्षण आयुक्त, पुणे व शिक्षण संचालक, पुणे यांना दिलेल्या निवेदनात केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००४ मध्ये सेवेत लागलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करण्यासाठी वेतन त्रुटी समिती स्थापन करावी तसेच सन २००३ आणि २००४ या वर्षातील शिक्षकांमध्ये एका वेतनवाढीचा फरक असणे अपेक्षित आहे, या वेतन त्रुटीमध्ये दोन वेतन वाढीचा फरक आढळून आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या वेतनातील त्रुटी दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१३-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) शिक्षकांच्या वेतनातील त्रुटी दुर करण्याच्या अनुषंगाने वाढीव वेतन मंजूर करण्यासाठी नव्याने समिती स्थापन करुन समितीचा अहवाल विहीत मुदतीत मा.उच्च न्यायालयास सादर करणेबाबत वित्त विभागास कळविण्यात आले आहे.

---

## कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) येथे महिला समुपदेशन केंद्र सुरू करण्याबाबत

**(५) २१९८८ (०६-१२-२०२३) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) या तालुक्यांच्या ठिकाणी महिला समुपदेशन केंद्र सुरू करण्यासाठी स्वयंसेवी संस्थाकडून महिला व बालविकास विभागांतर्गत प्रस्ताव मागविण्यात आले असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या पोलीस स्टेशनला महिला व मुले येतात त्यांचे प्रश्न व्यवस्थितपणे समजून घेणे व त्यांना कायद्याप्रमाणे मदत मिळण्यासाठी या समुपदेशन केंद्राचा उपयोग होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संस्थांना परवानगी देऊन महिला समुपदेशन केंद्र कर्जत व जामखेड तालुक्यांत सुरू करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने महिला समुपदेशन केंद्र सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (११-१२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) जिल्हास्तरावर प्रस्ताव प्राप्त झाले असून, जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे अध्यक्षतेखालील छाननी समितीकडे प्रस्तावांवर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक, पालघर, अहमदनगर, ठाणे व इतर जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागात टेलीमेडिसीन सेवा सुरू करणे बाबत

**(६) २२०३० (०६-१२-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हरीसाल (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सन २०१६ पासून शासनाने टेलिमेडिसीन सेवा सुरू केलेली आहे व त्याद्वारे दुर्गम परिसरातील आदिवासी व अन्य रुग्णांना प्रगत शहरातील डॉक्टरांची वैद्यकीय मदत देण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील टेलिमेडिसिन सेवेला चांगला प्रतिसाद मिळत असून अशी सेवा नाशिक, पालघर, अहमदनगर, ठाणे व इतर जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागात सुरू करणे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील उर्वरित दुर्गम आदिवासी भागातील समाजाला तसेच इतर नागरिकांना या टेलिमेडिसीन सेवेचा लाभ मिळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (११-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यातील सर्वच जिल्हयांमध्ये टेलिमेडिसीन/ टेलिकन्सलटेशन सेवा सुरू करण्यासाठी हब आणि स्पोक मॉडेल तयार करण्यात आले आहे. राज्यात सन २००७-०८ साली टेलिमेडिसीन सेवा टप्याटप्याने सुरु करण्यात आली असून, सद्य:स्थितीत जिल्हा रुग्णालये-२४, उपजिल्हा रुग्णालये-३६ आणि ग्रामीण रुग्णालये-१४ येथे टेलिमेडिसीन सेवा सुरु करण्यात आली आहे. सर्व रुग्णालये टेलीमेडिसीन अंतर्गत रुग्ण तपासणी करण्यासाठी ६ मेडिकल कॉलेज सोबत जोडण्यात आले आहे.

सन २०१९-२० मध्ये आरोग्यवर्धिनी टेलिकन्सलटेशन अंतर्गत १३ जिल्हयांमध्ये हब कार्यान्वित झाले असून उर्वरित २१ जिल्हयांमध्ये हब तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोग्यवर्धिनी टेलीकन्सलटेशन आणि टेलीमेडिसीन डॉक्टर ते डॉक्टर ओपीडी असून या सेवे अंतर्गत आजतागायत डॉक्टरांमार्फत ६१,८७,९५४ रुग्णांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला आहे. तसेच राज्यात इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन मोफत आरोग्य सेवा माहे एप्रिल, २०२० मध्ये सुरू करण्यात आली आहे. या सेवेद्वारे रुग्णांना इ-संजीवनी ॲप्लीकेशनमधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, चॅटचा वापर करून थेट घरबसल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी आजारांबाबत सल्लामसलत करता येते. सदर सेवे मार्फत रुग्ण सर्व आजारांबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांशी थेट घरी बसून संवाद साधू शकतात. कोविड १९ साथीच्या आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण जे घरून उपचार घेत आहेत किंवा विलगीकरण करण्यात आलेले रुग्ण देखील या सेवेचा लाभ घेऊ शकतात. या सेवेद्वारे आजतागायत २,९४,४६९ रुग्णांना त्यांच्या आजारांवर मोफत वैद्यकीय सल्ला देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापुर जिल्ह्यातील बचत गटांच्या कर्जपुरवठ्याचे उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत

**(७) २२१६० (०६-१२-२०२३) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामान्य ग्रामीण महिलांच्या उन्नतीसाठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या माध्यमातुन ‘उमेद’ अभियान राबविले जात असून ग्रामीण भागातील महिलांना छोट्या उद्योगातून रोजगार निर्माण करून आर्थिकदष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील महिलांच्या स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी उमेद अभियानाअंतर्गत स्वयं सहायता महिला बचत गटांना २०२३-२४ या आर्थिक वर्षात ३२० कोटी रुपयांचे

कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून माहे सप्टेंबर, २०२३ पर्यंत केवळ ९० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिलांना सक्षम करण्यासाठी बँकानी दक्ष राहुन वेळेत कर्जवितरण करण्याबाबत व कर्जवाटपाचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (११-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता सोलापूर जिल्ह्याला रुपये ३२० कोटीचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ अखेर daynrlmbl.aajeevika.gov.in या पोर्टलवरील उपलब्ध आकडेवारीनुसार रुपये १८६ कोटीचे कर्ज वितरण करण्यात आले असून, माहे मार्च, २०२४ अखेर उर्वरित उद्दिष्ट १००% साध्य करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली कर्ज वाटपासंदर्भात जिल्हा व तालुकास्तरावर उद्दिष्टनिहाय जिल्हा व तालुका कर्मचारी यांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. त्याचप्रमाणे बँक समन्वयाकरीता स्थापित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती (DLCC) व तालुकास्तरीय बँकर्स समिती (BLBC) मध्ये बँकनिहाय उद्दिष्ट व अडचणीबाबत आढावा घेण्यात येतो. तसेच स्वयं सहायता समूहांना कर्ज वितरण करण्याकरीता जिल्हा व तालुकास्तरावर बँक मेळावे आयोजित करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयातील आयसीयू बंद असल्याबाबत

**(८) २२३२८ (१५-१२-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा वाढवून १०० खाटांचे श्रेणीवर्धन व १ कोटी रुपये खर्च करून २५ रुग्ण खाटांचे आयसीयू तयार करण्यात आले असून तज्ञ डॉक्टरांच्या अपुऱ्या पदांमुळे सदर आयसीयू बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१२-२०२३) :** (१) उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट, जि.वर्धा या १०० खाटांच्या रुग्णालयात एप्रिल, २०२३ मध्ये २५ खाटांचा अतिदक्षता विभाग (आयसीयु) कार्यन्वित करण्यात आला आहे.

सदर रुग्णालय व ट्रामा केअर युनिटमध्ये विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण १७ पदे मंजूर असून त्यापैकी ०५ पदे भरलेली व १२ पदे रिक्त आहेत. उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे रुग्णांना उपचार देण्यात येत आहेत.
(२) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालयांसाठी वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवा देणाऱ्या सर्व मशिन्स बंद असल्याबाबत

**(९) २२३४३ (०६-१२-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील उपजिल्हा रुग्णालयात दररोज सुमारे ३५० रुग्ण उपचारासाठी येत असून सदर रुग्णालयातील सिटीस्कॅन, सोनोग्राफी, एमआरआय मशीन्स अनेक दिवसांपासून बंद असून चार ऑपरेशन थिएटरपैकी केवळ एकच ऑपरेशन थिएटर सुरु असल्याचे व रुग्णालयातील २५ पदे रिक्त असून कॉन्ट्रक्टवरील वॉर्डबॉय व सिस्टर्सना गेल्या ५ महिन्यांपासून पगार मिळाला नसल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात बंद स्थितीत पडलेल्या आरोग्य सेवा देणाऱ्या सर्व मशीन्स तातडीने चालू करुन त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांचे थकीत पगार देण्याबाबत व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, पनवेल,जि.रायगड येथे दररोज ३०० ते ३५० रुग्ण उपचारार्थ येतात. रुग्णालयातील सिटीस्कॅन, सोनोग्राफी मशिन्स सुस्थितीत चालू आहेत. उपजिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीन उपलब्ध नाही.

रुग्णालयात एकूण ५ ऑपरेशन थिएटर असून त्यापैकी ३ चालू आहेत व उर्वरीत २ ऑपरेशन थिएटर दुरुस्तीसाठी बंद आहेत.

रुग्णालयातील नियमीत व कंत्राटी अशा एकूण ११५ पदांपैकी ९७ पदे भरलेली व १८ पदे रिक्त आहेत. रुग्णालयात कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेले अधिपरिचारीका व वॉर्डबॉय यांचे माहे ऑक्टोबर,२०२३ पर्यंतचे थकीत वेतन दिनांक १०/११/२०२३ रोजी अदा करण्यात आलेले आहे.
(२) रुग्णालयातील यंत्रसामुग्री कार्यान्वित आहेत, तसेच कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेल्या अधिपरिचारीका व कक्षसेवकाची माहे ऑक्टोबर २०२३ पर्यंतचे वेतन अदा केलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील खापा, तिघई व गुमगाव येथील शेतकऱ्यांचे आक्षेप न नोंदवता जमीनी लीजवर दिल्याबाबत

**(१०) २२३६९ (२०-११-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील खापा, तिघई व गुमगाव येथील शेतकऱ्यांचे आक्षेप न नोंदवता महसूल विभागाने मे.मॉयल कंपनीस ३१३ एकर जमीन ५० वर्षांच्या लीजवर दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांकडून उक्त कंपनीला जमीन हस्तांतरीत करण्याबाबत प्रचंड प्रमाणात विरोध होत असून, त्याविरोधाची दखल न घेता तसेच शेतकऱ्यांकडून आलेल्या आक्षेपाची नोंद न घेता अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या जमिनीचे बेकायदेशीररित्या अधिग्रहण केले जात असून ते थांबविण्याबाबत तसेच मे.मॉयल करीता नव्याने प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (११-१२-२०२३) :** (१) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम,१९५७ नुसार मौजा.तिघई, गुमगाव व कोदेगाव, ता.सावनेर, जि.नागपूर येथील १२६.८४ हे. क्षेत्रावर असलेल्या जमीनीच्या खाली असलेल्या मँगनीज या प्रमुख खानिजासाठी केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या मे.मॉयल लि. यांना दिनांक २७/०१/२०२२ च्या आदेशान्वये ५० वर्षाकरीता लिज मंजूर करण्यात आलेली आहे.

(२) व (३) जमीनीच्या खाली असलेले प्रमुख खनिज हे राष्ट्रीय संपत्ती असून, या राष्ट्रीय संपत्तीचा विनियोग उपरोक्त अधिनियमानुसार करण्याचे अधिकार शासनास आहेत. तसेच प्रस्तुत खाण क्षेत्र हे भूमिगत असून, यासाठी या खनिज साठ्याच्या वर असलेल्या जमीनी अधिग्रहीत करण्याची बाब सद्य:स्थितीत अपेक्षीत नाही. भविष्यात आवश्यकता असल्यास, मॉईलद्वारा जमिनधारकांच्या जमिनी त्यांना विश्वासात घेवून नियमानुसार खरेदी करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रश्नात नमूद वस्तुस्थिती खरी नाही.

---

## पुरंदर तालुक्यातील घोरवडी धरणावरून सुपे खुर्द, पिंपळे,पोमणनगरसाठी सुरू असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांमध्ये निकृष्ट दर्जाचे काम झाल्याबाबत

**(११) २२५७५ (१५-१२-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील घोरवडी धरणावरून सुपे खुर्द, पिंपळे, पोमणनगरसाठी सुरू असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत हलक्या प्रतीचे साहित्य वापरण्यात येऊन निकृष्ट दर्जाचे काम झाल्याबाबत तसेच सदर तीन गावांसाठी स्वतंत्र योजना व अंदाजपत्रक असतानाही एकच चारी खोदून पाईपलाईनचे काम सुरू केल्याबाबतच्या लेखी तक्रारी तेथील ग्रामस्थांनी मा कार्यकारी अभियंता यांच्याकडे केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीन गावांसाठी निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारास कामाचे देयकही अदा करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाची चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली व या तीन गावातील पाणी योजनेचे काम पूर्ण होण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सदरचे काम निकृष्ट दर्जाचे नसून, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यंत्रणेमार्फत नेमलेल्या त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करून त्याचे अहवाल योग्य असल्याची खात्री झाल्यानंतरच योजनांचे चालु देयक अदा करणेत आले आहे.
(३) जल जीवन मिशन योजनेंतर्गत सर्वच योजनांची कामे विहित मुदतीत पूर्ण होण्यासाठी शासन स्तरावर आढावा बैठक घेण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळूनही सासवड (जि.पुणे) ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन झाले नसल्याबाबत

**(१२) २२५७९ (१८-१२-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सासवड (जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात आंतर व बाह्य रुग्ण कक्षात मोठ्या संख्येने रुग्ण येत असून रुग्णालयाची क्षमता ३० खाटांवरून ५० खाटांपर्यंत वाढविण्याबाबतचा सहसंचालक,आरोग्य सेवा, रुग्णालय (राज्यस्तर) यांच्यामार्फत पाठविलेल्या प्रस्तावास शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ अन्वये मान्यता मिळून पाच वर्षे होऊन तसेच रुग्णालयाच्या इमारतीसाठी अंदाजपत्रक व नकाशे तयार असूनही शासकीय महसूल यंत्रणेच्या अनास्थेमुळे तसेच कोरोना कालावधीचे कारण देत श्रेणीवर्धन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी रुग्णालयाचे दरपत्रक सर्वसामान्यांना परवडत नसल्यामुळे रुग्ण सदर ग्रामीण रुग्णालयातच उपचार घेत असून येथील डॉक्टरांकडे सक्षम पदविका नसतानादेखील डॉक्टरांच्या नावावर पॅनल नियुक्त पध्दतीने अतिदक्षता विभाग चालविला जात असल्याने रुग्णांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सासवड सोनोरी रस्त्याच्या पश्चिमेकडे ग्रामीण रुग्णालय असून या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय व्हावे ही नागरिकांची मागणी असून रुग्णालयाच्या बांधकामासाठी जागा कमी पडत असल्याने त्या जागेशेजारी जुन्या पंचायत समितीची मोकळी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सासवड येथे विविध सोयी सुविधांनी सुसज्ज असे उपजिल्हा रुग्णालय निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सासवड येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ नुसार करण्यात आलेले आहे. तथापि, सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी अद्याप जागा प्राप्त झालेली नाही.

(२) अंशतः खरे आहे.

सासवड येथील खाजगी तज्ञ वैद्यकिय व्यवसायीकांच्या मदतीने जनहितार्थ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभाग सुरु आहे. यामध्ये भिषक तज्ञ (डॉ. आञाम, एमडी मेडीसीन) यांचा समावेश आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सासवड जि.पुणे येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होणबाबतची कार्यवाही जिल्हा शल्यचिकित्सक पुणे व जिल्हाधिकारी पुणे यांचे स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील ट्रामा केअर सेंटरमधील आधुनिक यंत्रसामग्रीचा तंत्रज्ञान अभावी वापर होत नसल्याबाबत

**(१३) २२६६९ (०७-१२-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील ट्रामा केअर सेंटरमधील डॉक्टरासह अन्य रिक्त पदे, तंत्रज्ञाअभावी लाखो रुपयांची विनावापर पडून असलेली आधुनिक यंत्रसामग्री इ. मुळे रुग्णाची गैरसोय होत असून त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रामा केअर सेंटरला आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्यात येऊन सर्व रिक्त पदे भरून या परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे

देऊळगाव राजा, जि.बुलढाणा येथील ट्रामा केअर सेंटर साठी १३ पदे मंजूर असून त्यापैकी ०६ पदे भरलेली आहेत. सदर ट्रामा केअर सेंटर मध्ये विशेषज्ञांच्या अभावामुळे यंत्रसामुग्रीचा पुरेसा वापर होत नसला तरी उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे रुग्णांना उपचार देण्यात येत असून आवश्यकतेनुसार रुग्णांना जिल्हा रुग्णालय, जालना किंवा जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे संदर्भित केले जाते.

(२) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालयांसाठी वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गट-क व गट- ड ची पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द झालेली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यात कर्करोगावरील उपचारासाठी शासकीय रुग्णालय उपलब्ध नसल्याबाबत

**(१४) २२७१५ (०६-१२-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भात कर्करोगाच्या रुग्णांत वाढ होत असून पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यात कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी शासकीय रुग्णालय उपलब्ध नसल्याने गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी नागपूर, मुंबईमध्ये जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यांत कर्करोगावरील उपचारासाठी या विभागात शासकीय कर्करोग रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये टर्शरी कॅन्सर केअर सेंटर स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयांची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पश्चिम विदर्भ भागात अमरावती येथे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय आहे. येथे कर्करोग निदान व उपचार केले जातात.

(२) वर नमूद केल्याप्रमाणे अमरावती येथे संदर्भ सेवा रुग्णालय आहे. तेथे कर्करोगावरील स्तन, मुख, गर्भाशय मुख, कर्करोगाच्या शस्त्रक्रिया आणि किमोथेरपी इत्यादी आरोग्य सेवा दिल्या जातात.

(३) हे खरे आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे अमरावती येथील संदर्भ सेवा रुग्णालयात कर्करोग निदान व उपचार केले जातात. मात्र १०० टक्के खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. तथापि, टर्शरी कॅन्सर केअर सेंटर स्थापन करण्याबाबत केंद्र शासनाने मंजुरी दिल्यास त्यावरील ६० टक्के खर्च केंद्र शासनामार्फत करण्यात येईल.

(४) वर नमूद केल्याप्रमाणे, अमरावती येथे विभागीय संदर्भ सेवा, रुग्णालय आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली येथील कंपनीने प्रत्यक्षात प्रशिक्षण न देताच बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याबाबत

**(१५) २२७९१ (०७-१२-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १८ ते ३५ वयाच्या गरजू तरुण-तरुणींना केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून दिनदयाल उपाध्याय योजनेंतर्गत निवासी रोजगार प्रशिक्षण देण्याचा ठेका मिळालेल्या सांगली येथील कंपनीने प्रत्यक्षात प्रशिक्षण न देताच सातारा, सांगली आणि कराड या तीन जिल्ह्यांतील १००० बेरोजगार

तरुणांची फसवणूक केल्याची बाब दिनांक. २४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाची व बेरोजगार तरुणांची फसवणूक करणाऱ्या सदरहू कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१८-१२-२०२३) :** (१) तरुणांची फसवणूक केली आहे अशा बाबीची नोंद नाही. तथापि, योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रशिक्षण दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) जाई जुई चारिटेबल ट्रस्ट यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशिक्षण दिले नसल्याचे दिनांक १५/०४/२०२१ रोजी निदर्शनास आल्याने वितरीत निधी रक्कम रुपये ७९,४९,०००/- व त्यावरील १०% व्याज व २% पेनल्टी असा निधी परत करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत संस्थेला पत्र देण्यात आले व रक्कम विहित वेळेत भरणा न केल्यास MoU च्या मुद्दा क्र.१३ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत नमूद करण्यात आले. जाई जुई चारिटेबल ट्रस्ट यांना दिनांक १२/०५/२०२१ रोजी पुन्हा बैठकीसाठी बोलाविण्यात आले. तथापि, योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमधील मुद्दा क्र/१०/०३.२ नुसार वारंवार संधी देवूनही जाई जुई चारिटेबल ट्रस्ट यांनी दिलेले उद्दिष्ट पूर्ण न केल्यामुळे त्यांना दंड आकारणे व त्यांचा प्रोजेक्ट बंद करून काळ्या यादीत टाकण्याबाबत निर्णय घेण्यात आला व जाई जुई चारिटेबल ट्रस्ट यांना रुपये १,२१,०४,२५८/- व्याज व दंडासहित पुढील ३० दिवसांत भरण्याबाबत दिनांक २१/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत आदेश देण्यात आले. तसेच अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी दिनांक ०८/०९/२०२१ रोजी जाई जुई चारिटेबल ट्रस्ट व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यांच्यासह वैयक्तिक सुनावणी घेवून, जाई जुई चारिटेबल ट्रस्ट यांनी १५ दिवसांत रक्कम न भरल्यास वसुलीबाबत फौजदारी कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार शासनाचा निधी घेऊन विहित वेळेत काम न केल्याने व दिलेल्या निधीचा अपव्यय केल्यामुळे सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यांतर्गत कलम ४२०/४०६ अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संस्थेसोबत करण्यात आलेल्या सामंजस्यकरारा (MoU) मधील मुद्दा क्र.१३ नुसार Revenue Recovery Act, १८९० नुसार रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना आदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत कचरा पेटी खरेदी प्रकरणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) २२८२० (०६-१२-२०२३) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत १५ व्या वित्त आयोग उपलब्ध निधीतून कचरा पेटी खरेदी प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून मा.गट विकास अधिकारी यांनी कंत्राटदार सोबत संगनमत करून सदरची कचरा पेटी ही बाजार भावा पेक्षा सुमारे २५-३० पट जास्त दराने खरेदी केली असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणतीही चौकशी होऊ नये या करीता वरिष्ठ स्तरावर मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची खरेदी सुमारे १५ कोटी रुपयांपेक्षा अधिकची असून एकाच कंत्राटदारामार्फत झाल्याने सदरची चौकशी होणे करीता आर्थिक गुन्हे शाखा अथवा विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-१२-२०२३) :** (१) १५ व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तर या तीन्ही स्तरावर निधी प्राप्त होतो. माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये सदर विषयासंबंधी तक्रार व वृत्त प्रसिध्द झाले होते. परंतु जिल्हा परिषद स्तर व पंचायत | समितीस्तरावर सन २०२२-२३ व सन २०२३-२४ साठी निधी उपलब्ध झालेला नाही. माहे नोव्हेंबर- २०२३ मध्ये प्राप्त तक्रार ही ग्रामपंचायत स्तरासंबंधित असून या बाबत चौकशी समितीची स्थापना करणेत आलेली असून समिती मार्फत चौकशी चालु आहे
(२) सदर प्रकरणी चौकशी समितीची स्थापना करुन चौकशी चालु आहे.
(३) चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अमृत फार्मसी योजनेंतर्गत मेडिकल स्टोअर्सची संख्या वाढविण्याबाबत

**(१७) २२८२८ (०६-१२-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विविध प्रकारच्या कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी मोफत व कमी दरात औषधे उपलब्ध व्हावेत यासाठी केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत राज्यात फक्त तीनच ठिकाणी अमृत फार्मसी मेडिकल स्टोअर्स सुरू असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई, पुणे, नागपूर व कोल्हापूर येथे कॅन्सरग्रस्त रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता राज्यात जास्त प्रमाणात अमृत फार्मसी सुरू करण्यासाठी शासनाकडे वेगवेगळया संघटनांनी वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात अमृत फार्मसी योजनेंतर्गत मेडिकल स्टोअर्सची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-१२-२०२३) :** (१) अमृत फार्मसी मेडिकल स्टोअर्स तीनच ठिकाणी सुरू आहेत. तथापि, यामधुन कॅन्सरग्रस्त रुग्णांना मोफत औषध उपलब्ध होत नाहीत.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे ग्रामपंचायत कौडगाव (ता.पूर्णा, जि.परभणी) मध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) २२८३७ (१५-१२-२०२३) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ग्रामपंचायत कौडगाव (ता.पूर्णा, जि.परभणी) या ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच यांनी गत १० वर्षांपासून शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या विकासनिधीचा योग्य वापर न करता मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गट विकास अधिकारी पंचायत समिती पूर्णा यांनी चौकशी समिती गठीत केलेली आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(३) निरंक.

---

## मौजे धनगर टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) या ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी ग्रामसेवकाच्या संगनमताने बोगस व नित्कृष्ट दर्जाची कामे केल्याबाबत

**(१९) २२८३८ (१५-१२-२०२३) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धनगर टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) या ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी सलग ९ वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाच्या संगनमताने बोगस व नित्कृष्ट दर्जाची कामे केल्याने संबंधित कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषिंविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गट विकास अधिकारी पंचायत समिती पूर्णा यांनी चौकशी समिती गठीत केलेली आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(३) निरंक.

---

## वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागात ई-लायब्ररीसाठी रुपये ९० कोटीच्या निविदेमध्ये होणारे गैरप्रकार थांबिविण्याबाबत

**(२०) २२८४१ (१५-१२-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याद्वारे राज्यातील २५ कॉलेजमध्ये ५ वर्षांसाठी ई- लायब्ररीकरीता दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास रुपये ९० कोटीची ई-निविदा प्रसिध्द करताना कोणतीही स्थायी समिती नियुक्त करण्यात आली नसल्याचे, कोणतीही तांत्रिक मान्यता तसेच कोणतेही नियम न पाळल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई- लायब्ररीकरीता शासन खर्च करणार असून इतर राज्यात प्रति कॉलेज सरासरी फक्त १० ते १५ लाख रुपये खर्च येत असताना राज्यात ई-लायब्ररी करीता प्रति कॉलेज ३.६ कोटी खर्च येत असल्याने शासनस्तरावर समिती गठीत करून प्रसिध्द करण्यात आलेली निविदा तपासून निविदा प्रक्रिया थांबविण्यासाठी मुख्य सचिवांकडे दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देवून पाठपुरावा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासन स्तरावरुन प्रसिध्द झालेली ही निविदा तात्काळ रद्द करुन होणाऱ्या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) दिनांक ०३/११/२०२३ अन्वये डिजीटल ई-लायब्ररी निविदा रद्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.